क्र.साप्रवि/रवका/न.क्र.६६४/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १७९ दिनांक ३० / ०९ / २००८

विषय : 'विधी सहाय्यक' या पदाकरिता उच्चस्तर वेतनश्रेणीचा आणि एकस्तर पदोन्नतीचा लाभ देण्याबाबत.

संदर्भ : १) सामान्य आदेश क्र.७४ दिनांक ३०.०४.१९७४
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दिनांक २३.०१.२००३

......

सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ मधील तरतुदीनुसार महावितरण कंपनीमध्ये कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना उच्च वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात येतो. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दिनांक २३.०१.२००३ अन्वये दुर्गम क्षेत्रातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा भाग म्हणून त्याने धारण केलेल्या मूळ पदाच्या नजिकच्या/पदोन्नतीच्या वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे.

२. या अनुषंगाने 'विधी सहाय्यक' या नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना सदर लाभ देण्यासाठी वेतनश्रेण्या निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता. आता सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ चे सुधारपत्र क्र.१० दिनांक २२.११.१९८४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार संचालक (वित्त) यांनी संचालक (संचलन) व कार्यकारी संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन 'विधी सहाय्यक' या पदास पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध नसल्यामुळे सदर लाभ खालीलप्रमाणे मंजूर करण्यास मान्यता दिली आहे.

| **पदनाम व मूळ वेतनश्रेणी** | **सा.आ.क्र.७४ (क) चा लाभ द्यावयाच्या वेतनश्रेण्या** | |
|---|---|---|
| | **पहिला लाभ** (६ वर्षे पूर्ण झाल्यावर) | **दुसरा लाभ** (पहिला लाभ घेतल्यानंतर पुढील ६ वर्षे पूर्ण झाल्यावर) |
| **विधी सहाय्यक** रु.६५८५-३१०-८१३५-३२५-१६५८५ | रु.९१७०-३६०-१०९७०-३९०-२०३३० | रु.९८००-३९०-११७५०-४१५-२२२१५ |

३. तसेच आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असेपर्यंत 'विधी सहाय्यक' या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नतीचा लाभ सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ चा पहिला लाभ ज्या वेतनश्रेणीत द्यावयाचा आहे त्याच वेतनश्रेणीत म्हणजे रु.९१७०-३६०-१०९७०-३९०-२०३३० मध्ये देण्यात यावा.

४. सा.आ.क्र. ७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ व प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दिनांक २३.०१.२००३ मधील इतर तरतुदी अबाधित राहतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु. य. पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
विभागीय व त्यावरील स्तराच्या सर्व कार्यालयांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/Adm.Cir.- F.N.664*